# राष्ट्रीय आरोग्य अभियान (नवसंजिवनी कार्यक्रम)
# कंत्राटी पदांची पदभरती
## जाहीरात (सन २०२४-२५)
## राष्ट्रीय आरोग्य अभियान
## जिल्हा - अमरावती
## नोंदणी क्र. ७३६/०५

राष्ट्रीय आरोग्य अभियान, नवसंजिवनी कार्यक्रमा मध्ये अमरावती जिल्हयात विविध कार्यक्रमाअंतर्गत पदांची पदभरती प्रक्रिया कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर राबविण्यात येत असुन, खालील तक्त्यानुसार पात्र असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. .

### राष्ट्रीय आरोग्य अभियान (नवसंजिवनी कार्यक्रम)

| Sr. No. | Cadre Name | Name of Post | No. of Post | Qualification | Remunera-tion (Per Month Consolidated) | Working Place |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Specialist | Gynaecologists | 2 | MD/ MS Gyn / DGO / DNB | 75,000/- | Chikhaldara-01 Dharni-01 |
| 2 | | Paediatricians | 2 | MD Paed / DCH / DNB | 75,000/- | Chikhaldara-01 Dharni-01 |
| 3 | Staff Nurse | Staff Nurse | 4 | B.Sc Nursing / GNM with Nursing Council Registration | 18,000/- | Chikhaldara-02 Dharni-02 |
| Total | | | 8 | | | |

वरील प्रमाणे मंजुर पदे असलेल्या निव्वळ कंत्राटी पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व छायांकित केलेल्या साक्षांकित प्रतीसह उपरोक्त नमुद केलेल्या मंजुर पदांसाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि.12/02/२०२५ पासुन ते दि. 22/02/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासुन ते ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन) स्विकारण्यात येतील, तसेच दि.22/02/२०२५ नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा व ई-मेलद्वारे प्राप्त अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय कॅम्प, अमरावती. (मेळघाट सेल) विभाग**

### अ) उमेदवारांकरीता सर्वसाधारण सुचना

१) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

२) उपरोक्त पदांकरीता इच्छूक उमेदवारांनी अर्जासोबत **"District Integrated Health & Family Welfare Society, Amravati"** या नावे देय असलेला रु.१५०/- चा (ना परतावा) राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष (डि. डि.) जोडावा. तसेच धनाकर्षाच्या मागे स्वतःचे नांव स्वःहस्ताक्षरात लिहावे.

३) जाहिरातीतील पदे ही राज्य शासनाची नियमितची पदे नसुन सदरील पदे नवसंजिवनी कार्यक्रमा अंतर्गत नविन उपक्रमामध्ये मार्च २०२५ पर्यतची निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचे हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

४) जाहिरातीत नमुद वय अर्ज, शैक्षणिक अर्हता, अनुभव व नोंदणी प्रमाणपत्र जाहीरातीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत ग्राहय धरले जाईल.

५) सदर पदाकरीता प्रतिक्षा यादी ही मार्च २०२५ पर्यत मंजुर राहील. तसेच भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास नविन भरती प्रक्रिया न करता प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जातील.

६) उपरोक्त पदांसमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

७) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार ऐकूण घेण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना निवड यादीतील गुणानुकमांकाच्या आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. याबाबत उमेदवारांना कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

८) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा पदावर रुजू होतांना सादर करावा लागेल. तसेच नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांमध्ये रुजु होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांचा नियुक्ती आदेश संपुष्टात आणून प्रतिक्षाधीन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

९) अर्ज सादर करणे करीता उमेदवारांना प्रवास भत्ता व इतर भत्ता देय राहणार नाही.

१०) जाहिरातीमधील पदांच्या संख्येत व पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होवू शकतो. अटी व शर्तीमध्ये बदल करणे व पदभरती स्थगित करणे/ रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार हे कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलवुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१२) निवड झालेल्या उमेदवारांना रुजु करुन घेण्यापुर्वी सर्व आवश्यक मुळ प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करावे लागतील.

१३) उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही थेट गुणवत्तेनुसार घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमुद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

१४) दि.२ डिसेंबर २०२१ रोजीच्या राज्यस्तरीय पत्रानुसार शासकिय प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतलेल्या आशांना आरोग्य सेवेची संधी प्राप्त व्हावी याकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियानातील रिक्त कंत्राटी पदावर.नियुक्ती देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने पदसंख्येत बदल करण्याचे अधिकार निवड समिती राखून ठेवत आहे.

१५) भविष्यामध्ये मा. सहाय्यक आयुक्त यांच्या बिंदूनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पूर्व सुचना न देता कमी करण्यात येईल.

१६) सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र.:सकिंर्ण-२७१५/प्र.क्र./१००/१३ दि.१७.१२.२०१६ नुसार अदा करण्यात येईल.

१७) सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणताही आक्षेप असल्यास याचे निवारण करण्याचा अधिकार मा.अध्यक्ष तथा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना राहतील.

१८) नवसंजिवनी कार्यक्रमात नविन उपक्रमा मध्ये भरण्यात येणारी पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरती मार्गदर्शक सुचनेनुसार भरण्यात येईल. परंतु सदरील पदांचा राष्ट्रीय आरोग्य अभियानाशी संबंध नाही. त्यामुळे भविष्यात सदरील योजना/कार्यक्रम बंद पडल्यास अथवा पदांना मंजुरी न मिळाल्यास त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानमध्ये सामावून घेण्याचा दावा करता येणार नाही.

१९) राष्ट्रीय आरोग्य अभियाना अतंर्गत भरण्यात येणाऱ्या पदांना दिनांक ३/९/२०१५ च्या राज्यस्तरीय पत्रान्वये सामाजिक आरक्षण लागु करण्यात आले आहे.सदरहि पदे नवसंजिवनी कार्यक्रमामधिल नविन उपक्रमाअतर्गत मार्च २०२५ पर्यत मेळघाट क्षेत्रातील उमेदवारा मधुन भरवयाची असल्याने सामाजिक आरक्षणाचा विचार केल्या जाणार नाही.

२०) **सविस्तर जाहिरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, आक्षेप, आक्षेपाचे निराकरण, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबतची सर्व माहिती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद, अमरावती zpamravati.gov.in जिल्हयाच्या या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.**

## ब) उमेदवारांकरीता पात्र/अपात्रतेबाबत सुचना

१) सदर पदांकरीता अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

२) जाहिरातीमध्ये नमुद पदांना तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण प्रमाणपत्र/कौन्सिलचे नुतनीकरणासाठी अर्ज सादर केल्याबाबतची पावती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. तसेच कौन्सिलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तथापी अवैद्य प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना भरतीप्रक्रियेतुन अपात्र ठरविले जाईल.

३) दोनपेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी पदावर यापुढे निवड करण्यात येणार नाही. याकरीता लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेल्या नमुन्यानुसार सादर करावे.

४) नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची सर्व मुळ (Original) कागदपत्र निवड समिती मार्फत पडताळणी करुन सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

५) जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील.

६) उमेदवारांनी अर्जासोबत कागदपत्रे अपूर्ण जोडल्यास उमेदवारास अपात्र ठरवल्या जाईल.

७)वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासननिणर्याव्दारे अपात्र आहेत.

८) निवड झालेल्या उमेदवारांनी सादर केलेले अनुभव प्रमाणपत्रासोबत शेवटच्या तिन महीण्याचे बॅक स्टेटमेंट जोडण्यात यावे. सदर अनुभव प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी कार्यालयामार्फत करण्यात येईल. त्यामध्ये खोटेपणा आढळल्यास उमेदवारास निवडीचे पुढील प्रक्रियेस अपात्र ठरविण्यात येईल.

९) सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

१०) वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस), विशेषज्ञ आणि अतिविशिष्ट विशेषज्ञ यांना ७० वर्ष व इतर रुग्ण सेवेशी संबंधित पदांसाठी (उदा. परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता) वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचारी ५ वर्ष वयोमर्यादा शिथील राहील.

११) शासन निर्णय दि.१३ जानेवारी २००९ नुसार खुला (अमागास) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळता इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दि.३१ मार्च २०२३ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१२) स्टाफ नर्स पदाकरीता मेळघाट क्षेत्रातीलच रहीवासी पात्र राहतील.(स्वयंघोषना पत्र आधार नबंरसह आवश्यक)

## क) शैक्षणिक अर्हतेबाबत सुचना

१) ज्या उमेदवारांना ग्रेड सिस्टीम **CGPA / SGPA** नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनीअर्ज करीत असतांना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टककेवारी अचूकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टककेवारी नमुद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी. तत्सम स्वरुपात कागदपत्रे सादर न केल्यास त्यांचे गुण देय राहणार नाही व त्याकरीता निवड समिती जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) खालील गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

| अ.क्र. | विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १. | पदासाठी आवश्यक Qualifying Examमधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टककेवारीचे ५० प्रमाणे Proportionकाढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणेProportion = 60*50/100=30 | ५० गुण |
| २. | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्ये अधिक शैक्षणिक अहर्ता असल्यास विचारात घेण्यात येईल. | अधिकतम २० गुण दयावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टककेवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा. १. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion = 60*20/100=12 गुण) | २० गुण |
| ३. | संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण दयावेत. (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | **एकूण** | **१०० गुण** |

३) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करतांना उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल.

४) ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्याची जिल्हा स्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| **जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती** | **जिल्हा माताबाल संगोपण अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती** | **जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती** | **मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती** |

# राष्ट्रीय आरोग्य अभियान (नवसंजिवनी कार्यक्रम)

# कंत्राटी पदांची पदभरती

## जाहीरात (सन २०२४-२५)

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा - अमरावती

## नोंदणी क्र. ७३६/०५

राष्ट्रीय आरोग्य अभियान, नवसंजिवनी कार्यक्रम, आरोग्य विभाग, अमरावती जिल्हयात विविध कार्यक्रमाअंतर्गत पदांची पदभरती प्रक्रिया कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर राबविण्यात येत असुन, खालील तक्त्यानुसार पात्र असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**विविध पदे :-**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान (नवसंजिवनी कार्यक्रम)**

**(1)** Gynaecologists – 02, **(2)** Paediatricians – 02, **(3)** Staff Nurse -04

वरील पदांकरीता मुलाखत दिनांक तसेच आवश्यक शैक्षणिक पात्रता, अनुभव, आवेदन शुल्क ई. बाबत सविस्तर जाहीरात व माहिती **zpamravati.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज सादर करण्याचे स्थळ :- राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा कार्यालय, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय कॅम्प, अमरावती** (मेळघाटसेल विभाग)

टिप - भरती बाबतचे वेळापत्रक तसेच दिनांक/निवड/प्रतिक्षा यादी ई. बाबतची सर्व माहिती व जाहिरात अटी व शर्तीसह **zpamravati.gov.in** वर उपलब्ध आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती | जिल्हा माताबाल संगोपण अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती | जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती |

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद, अमरावती

(नवसंजीवनी कार्यक्रम)

**अर्जदाराच्या माहीतीचा फॉर्म दिनांक - ____________**

जाहिरातीनुसार पद क्र. :- ________ (अनिवार्य)

अर्ज केलेल्या प्रवर्गाचे नाव :- ___________ (अनिवार्य)

**अर्ज केलेल्या पदाचे पूर्ण नाव** - ........................................................................ (अनिवार्य)

- अर्जदाराचे संपुर्ण नाव - ..........................................................................................
- अर्जदाराचा संपुर्ण पत्ता - ..........................................................................................

  ................................................ पिनकोड ..................
- अर्जदाराची जन्मतारीख - ............................ जाहीरात दिनांक पर्यंतचे वय ................ वर्ष
- जात :- ............... मुळ जातीचा प्रवर्ग :- ............... (अनिवार्य)

| SC | | ST | | VJA | | NT-B | | NT-C | | NT D | | SBC | | OBC | | OPEN | | SEBC | | EWS | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

- दुरध्वनी क्रमांक :- (१) ................................ (२) ........................................
- MS-CIT :- आहे / नाही Tally :- आहे / नाही इतर संगणक कोर्सचे नाव .........................
- तांत्रिक पदाचे रजिस्टेशन सर्टिफिकेट असल्यास नोंदणी क्र.- ..............................................
- **शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | पदवी/ पदवीका/पदव्युत्तर पदविका किंवा पदवी | अंतीम वर्षात मिळालेल्या गुणांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

- **अनुभव**

| अ.क्र. | शासकिय, निमशासकिय/स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान | अनुभवाचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी

---

**कार्यालयीन कामासाठी**

**पात्र/ अपात्र** तसेच अपात्र असल्यास कारण -: ..............................................................

अधिकाऱ्याची स्वाक्षरी
नाव व पदनाम

## लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना - अ

**[महाराष्ट्र नागरी सेवा मर्यादित (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ), नियम २००५ नुसार ]**

मी श्री / श्रीमती/- - - - - - - - - - - श्री/- - - - - - - - - - - यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय - - - - - वर्ष, राहाणार - - - - - - - - - - याद्वारे असे जाहीर करतो/करते की,

१) मी - - - - - - - - - - - या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला - - - - - - -(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या - - - - - इतकी आहे.) (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्हत / अपात्र ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी

दिनांक :
ठिकाण :